महाराष्ट्र वन विभाग

# मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

ISO 9001:2008
Certified by IRQS
MGMT. SYS.
RvA C 071

विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याबाबत.
**400 केव्ही विक्रोळी रिसीव्हिंग स्टेशन आणि संबंधित इनकमिंग ट्रान्समिशन लाईन्सच्या बांधकामाकरीता 52.5549 हे. क्षेत्रापैकी 1.8600 हे. वगळता उर्वरीत 51.3635 हे. कांदळवन जमिन मागणी प्रस्ताव.**

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.52/13-14/जा.क्र.624/22-23
ठाणे - 400603, दिनांक -20/02/2023.

वाचा:-

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर कडील पत्र क्र.कक्ष-17/नोडल/ठाणे/आयडी-13151(76)/718, दिनांक 24.06.2022.
2) राज्य शासन पत्र क्र.FLD-2022/CR-192/F-10, दि.21.07.2022.
3) केंद्र शासन पत्र क्र.FC-III/MH-49/2022-NGP/10223, दि.26.08.2022.
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष-3/जमिन/3293, दि.13.02.2023.
5) केंद्र शासन पत्र क्र.F. No.11-22/2021-IA-III, दिनांक 28.10.2021.
6) विभागीय वन अधाकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचेकडील पत्र क्र.कक्ष-9/जमिन/ESZ/1388, दिनांक 05.09.2022.
7) प्राधिकृत अधिकारी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. मर्यादित यांचेकडील पत्र क्र. KVTPL/FCA/CCF/130, दिनांक 13.01.2023.
8) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.37/566, दिनांक 18.01.2023.
9) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष-3/जमिन/3313, दि.15.02.2023.
10) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि. 08.08.2014.
11) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि. 15.01.2015.
12) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.11/306/2014, दि. 07.05.2015.
13) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014-एफसी पार्ट दि.28.08.2015.
14) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दि.01.07.2015.

आदेश -

प्राधिकृत अधिकारी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. मर्यादित, अदानी कार्पोरेट हाऊस, शांती ग्राम हायवे, अहमदाबाद, गुजरात - 382421 या प्रकल्प प्राधिकरणाचा 400 केव्ही विक्रोळी रिसीव्हिंग स्टेशन आणि

संबंधित इनकमिंग ट्रान्समिशन लाईन्सच्या बांधकामाकरीता 52.5549 हे. कांदळवन जमिन मागणी प्रस्ताव कांदळवन कक्षाकडून विहित मार्गाने सादर झाल्यानंतर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांच्याकडून उपरोक्त अ.क्र.1 अन्वये राज्य शासनास सादर केला होता. तद्नंतर सदर प्रस्ताव अ.क्र. 2 अन्वये राज्य शासनाकडून केंद्र शासनास सादर झाला होता.

आणि ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 52.5549 हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्र शासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, केंद्र शासनाकडून सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.3 अन्वये काही अटीं शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने पर्यायी वनीकरण, वनाचे प्रत्याशी मुल्य आणि वृक्षनिष्कासनाचे अपेक्षित रक्कम कॅम्पा प्राधिकरणाने वर्ग केली आहे. केंद्र शासनाच्या तत्वत: मंजूरी पत्रातील अटी / शर्तीची पूर्तता अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्याकडून अ.क्र. 4 च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सादर झालेला आहे.

सदर प्रस्तावातील केंद्र शासनाच्या तत्वत: मान्यता पत्रातील अटी-शर्तीनुसार विविध प्रयोजनासाठी प्रकल्प प्राधिकरणाने खालील प्रमाणे रक्कमा कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेल्या आहेत.

| अ.क्र. | रक्कम हस्तातंरीत केल्याचा दिनांक | प्रयोजन | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | 12.12.2022 | वनाचे प्रत्याशी मुल्य (Net Present Value) | 8,71,53,143/- | सदर रक्कम प्रकल्प यंत्रणेने कॅम्पा प्राधिकरणाकडे अदा केलेली आहे. |
| 2. | | पर्यायी वनीकरण (CA) | 8,12,54,936/- | |
| 3. | | प्रस्तावित क्षेत्राचे सिमांकन | 15,87,510/- | |
| 4. | | पर्यायी वनीकरण क्षेत्रात वनतलाव/ साठवणतलाव करणेसाठीची आवश्यक रक्कम. | 44,96,842/- | |
| 5. | | कांदळवन वृक्षतोडीच्या बदल्यात 6 पट कांदळवन लागवडीसाठीची आवश्यक रक्कम | 5,04,553/- | |
| एकूण (A) | | | 17,49,96,984/- | |
| 6. | 13.12.2022 | वृक्ष निष्कासनासाठी लागणारी आवश्यक रक्कम | 15,71,272/- | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे. |
| एकूण (B) | | | 15,71,272/- | -- |
| एकूण एकंदर (A+B) | | | 17,65,68,256/- | -- |

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाकडून अ.क्र.5 अन्वये काही अटी / शर्तींच्या अधिन राहून सदर प्रस्तावास CRZ मान्यता प्राप्त झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 नुसार प्रकल्प प्राधिकरणाने प्रकल्प प्राधिकरणाने संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीका तयार करून 25000 विविध वन प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करून ठेवावा.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अट क्र.9 अन्वये राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मंजूरी प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. प्रस्तावांतर्गत 52.5549 हे. कांदळवन क्षेत्र आणि 23.0586 हे. खाजगी क्षेत्र असे एकूण 75.8135 हे. क्षेत्र समाविष्ट असून यापैकी 1.8600 हे. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्रामध्ये येते. याबाबत राज्य वन्यजीव मंडळाने त्यांच्या दि.21.09.2022 रोजीच्या 19 व्या सभेत काही अटी / शर्तींच्या अधिन राहून अभिप्राय देऊन प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबीत आहे. तसेच प्रस्तावांतर्गत विद्युतवाहिनी जात असलेल्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राकामी सदस्य सचिव, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, ESZ संनियंत्रण समिती तथा विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी काही अटी / शर्तींच्या अधिन राहून अ.क्र. 6 अन्वये मंजूरी दिलेली आहे.

केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.9 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने राज्य वन्यजीव मंडळाने (SBWL) त्यांच्या दि.21.09.2022 रोजीच्या 19 व्या सभेत काही अटी / शर्तींच्या अधिन राहून अभिप्राय देऊन प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबीत आहे. बाबत राज्य वन्यजीव मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार प्रकल्प प्राधिकरणाने रु. 6,94,64,000/- एवढी रक्कम कांदळवन फाउंडेशन कडे वर्ग केलेली आहे. तसेच ठाणे फ्लेमिंगो अभयारण्याचा व्यवस्थापन आराखड्यास मंजूरी प्राप्त होऊन कार्यान्वीत आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन पत्रातील अट क्र. 10 ला अनुसरून प्रकल्पांतर्गत क्षेत्रात कांदळवन वृक्षतोड होणार असल्याने, 6 पट स्थानिक कांदळवन प्रजातीची लागवड करण्याकामी प्रकल्प प्राधिकरणाने रक्कम रु. 5,04,553/- एवढी कांदळवन प्राधिकरणाकडे अदा केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने Bird diverters shall be installed at suitable interval throughout the entire transmission line in consultation with State Government and also as per directions of the Hon'ble Supreme Court बाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.13 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने पुढील 10 वर्षासाठी स्थळ विविक्षित (Site Specific) वन्यजीव संरक्षण आराखडा तयार करुन अंमलबजावणी करावयाची आहे. त्याबाबतचा अहवाल प्रकल्प यंत्रणेने केंद्रशासनास तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तींच्या पूर्तता अहवालासोबत सादर करावयाचा आहे. बाबत उप वनसंरक्षक यांनी ठाणे खाडी फ्लेमिंगो

अभयारण्यसाठीचा वन्यजीव संरक्षण आराखडा तयार केलेला असून त्याची मान्यता घेतली आहे, तसेच सदर आराखड्याची अंमलबजावणी सुरु आहे.

आणि ज्याअर्थी, सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 14037/2022 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 09.01.2023 रोजी काही अटी / शर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे. सदर आदेशातील अटी नुसार प्रकल्प प्राधिकरणाने 15,000 कांदळवन वृक्षाची लागवड करणे आवश्यक आहे किंवा त्याकामी लागणारी रक्कम कांदळवन प्राधिकरणाकडे वर्ग करणे अपेक्षित आहे

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी ठाणे व मुंबई उपनगर यांच्याकडून वन हक्क कायदा 2006 प्रमाणपत्र अद्याप मिळणेवर प्रलंबीत आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावांतर्गत समाविष्ट वनक्षेत्राच्या बदल्यात नाशिक वनवृत्तातील अहमदनगर वनविभागात मौजे वडनेर, चिंचले, वांकुटे व वडगाव सावतल या गावातील 106 हेक्टर इतक्या दुप्पट अवनत वन क्षेत्रावर पर्यायी वनीकरण प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.18 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाच्या देखरेखीखाली करावयाचे आहे. बाबत प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 15,87,510/- अदा केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, प्रकल्प प्राधिकरणाने अ.क्र. 7 च्या पत्रान्वये प्रकल्पांतर्गत क्षेत्रात कामे सुरु करण्यास व वृक्षतोड करण्यास परवानगी मिळणेकामी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांच्याकडे विनंती केली होती. त्यास अनुसरून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्याकडून अ.क्र. 8 च्या पत्रान्वये मागविलेला अहवाल त्यांचेकडून अ.क्र. 9 च्या पत्रान्वये प्राप्त झालेला असून त्यात 1.8600 हे. क्षेत्रासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता अप्राप्त असल्याचे नमूद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणात केंद्रशासनाकडून तत्वत: मान्यता, कांदळवन वृक्षतोडीसाठी मा. उच्च न्यायालयाची परवानगी आणि CRZ मान्यता प्राप्त झालेली आहे. तथापी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये समाविष्ठ असलेल्या 1.8600 हे. क्षेत्रासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त नाही.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र.10, 11 व 12 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.13 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन प्रा., पाण्याची पाईप प्रा., ऑप्टीकल फायबर केबल प्रा., रेल्वे प्रा. इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करून सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर

प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र.14 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

आणि त्याअर्थी, **ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये समाविष्ठ असलेल्या 1.8600 हे. क्षेत्रासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त नसल्यामूळे सदर क्षेत्र वगळून 52.5549 हे. क्षेत्रापैकी 51.3635 हे. कांदळवन क्षेत्रात वृक्षतोड व कामे सुरु करण्यास परवानगी (Working Permission) देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे. प्रकल्प यंत्रणा आणि विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे कार्यालयातील संबंधितांशी विचारणा केल्यानुसार मौजे मुलूंड येथील खाजगी क्षेत्र परंतू ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये समाविष्ठ असलेले 0.6686 हे. क्षेत्रात देखील राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या (NBWL) मान्यतेशिवाय वृक्षतोड व कामे सुरु करता येणार नाहीत.**

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देत आहे की, सदरचा प्रकल्प एकरेषीय असल्यामुळे व याबाबत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना अस्तित्वात असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच प्राधिकृत अधिकारी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. मर्यादित, अदानी कार्पोरेट हाऊस, शांती ग्राम हायवे, अहमदाबाद, गुजरात यांना 400 केव्ही विक्रोळी रिसीव्हिंग स्टेशन आणि संबंधित इनकमिंग ट्रान्समिशन लाईन्सच्या बांधकामाकरीता 51.3635 हे. कांदळवन जमिन वळते करणेबाबत, खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रात झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेस परवानगी (Working Permission) देण्यात येत आहे. ही परवानगी खालील अटी/शर्ती पूर्ततेच्या अधिन राहून देण्यात येत आहेः-

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात कामे करणे व झाडे तोडण्यापुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि.20.02.2024 पर्यंतच वैध (Valid) राहिल. दिनांक 21.02.2024 पासून सदर परवानगी आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल.

2) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.5 ला अनुसरून प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होणे अपेक्षित आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी रक्कम रुपये 15,71,272/- विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचेकडे अदा केलेली आहे. सदर वृक्षतोड ही वनविभागाच्या देखरेखीखाली व प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने करावयाची आहे. सदर वृक्षतोड प्रकल्प यंत्रणेने विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे देखरेखीखाली आवश्यकतेनुसार करावयाची आहे.

3) सदर प्रकल्पास केंद्रशासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून वनजमिन वळतेकरण आदेश अप्राप्त आहेत. तत्वत: मिळालेल्या दिनांका पासून 6 महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल सादर करतील. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

4) सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षाची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका क्रमांक 14037/2022 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 09.01.2023 रोजी दिलेल्या आदेशातील अटी / शर्ती प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

सदर आदेशातील अटी नुसार प्रकल्प प्राधिकरणाने 15,000 कांदळवन वृक्षाची लागवड करणे आवश्यक आहे किंवा त्याकामी लागणारी रक्कम कांदळवन प्राधिकरणाकडे वर्ग करणे अपेक्षित आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

5) केंद्र शासनाकडून अ.क्र.5 अन्वये काही अटी / शर्तींच्या अधिन राहून सदर प्रस्तावास CRZ मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर मान्यता पत्रातील अटी / शर्ती प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

6) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.7 ला अनुसरुन वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून प्रकल्प प्राधिकरणाने सादर केलेले नाही, बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील, याबाबत प्रकल्प यंत्रणेने वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेणेबाबतची कार्यवाही सुरु असलेबाबत बंधपत्र सादर करून संबंधित जिल्हाधिका-यांकडून प्राप्त झालेनंतर सादर करणेबाबत कळविले आहे. अट क्र.7 ला अनुसरुन नियम 9(6)(b)(ii) वन (संवर्धन) अधिनियम 2022 दिनांक 28.06.2022 अन्वये वन हक्क कायदा, 2006 अंतर्गत settlement of rights संबंधित, सदर अटींमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प यंत्रणेस वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अटीचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांनी घ्यावी.

7) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 नुसार प्रकल्प प्राधिकरणाने प्रकल्प प्राधिकरणाने संयुक्त वनव्यवस्थापन समितींच्या सहभागाने रोपवाटीका तयार करून 25000 विविध वन प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्वदेशी / स्थानिक रोपे 10 वर्षासाठी तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना त्यांच्या निवडीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे. संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समितीने रोपे लागवडीचा / रोपे वाटपाचा अभिलेखा जतन करणे बंधनकारक राहील. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करून मान्यता प्राप्त करून कार्यान्वीत आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

8) केंद्र शासन पत्रातील अट क्र. 9 नुसार प्रकल्प यंत्रणेने राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची (NBWL) मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रस्तावांतर्गत ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य क्षेत्रासाठी राज्य वन्यजीव मंडळाने (SBWL) त्यांच्या दि.21.09.2022 रोजीच्या 19 व्या सभेत काही अटी / शर्तींच्या अधिन राहून अभिप्राय देऊन प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबीत आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडून मंजूरी प्राप्त करून घेणे प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहील. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त झाल्याशिवाय 1.8600 हे. क्षेत्रात वृक्षतोड व कामे सुरु करता येणार नाहीत. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.9 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने राज्य वन्यजीव मंडळाने (SBWL) त्यांच्या दि.21.09.2022 रोजीच्या 19 व्या सभेत काही अटी / शर्तींच्या अधिन राहून अभिप्राय देऊन प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव मंजूरीसाठी प्रलंबीत आहे. बाबत राज्य वन्यजीव मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार प्रकल्प प्राधिकरणाने रु.

6,94,64,000/- एवढी रक्कम कांदळवन फाउंडेशन कडे वर्ग केलेली आहे. तसेच ठाणे फ्लेमिंगो अभयारण्याचा व्यवस्थापन आराखड्यास मंजूरी प्राप्त होऊन कार्यान्वीत आहे.

9) ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये समाविष्ठ असलेल्या 1.8600 हे. क्षेत्रासाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त नसल्यामूळे सदर क्षेत्र वगळून 52.5549 हे. क्षेत्रापैकी 51.3635 हे. कांदळवन क्षेत्रात वृक्षतोड व कामे सुरु करण्यास परवानगी (Working Permission) देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे. प्रकल्प यंत्रणा आणि विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांचे कार्यालयातील संबंधितांशी विचारणा केल्यानुसार मौजे मुलूंड येथील खाजगी क्षेत्र परंतू ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये समाविष्ठ असलेले 0.6686 हे. क्षेत्रात राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या (NBWL) मान्यतेशिवाय वृक्षतोड व कामे सुरु करता येणार नाहीत. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील. तसेच विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांनी सदर क्षेत्रात वृक्षतोड व कामे होणार नाहीत बाबत क्षेत्रिय स्तरावर सनियंत्रण (Control) ठेवावे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील

10) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने Bird diverters shall be installed at suitable interval throughout the entire transmission line in consultation with State Government and also as per directions of the Hon'ble Supreme Court सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील

11) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.13 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने पुढील 10 वर्षासाठी स्थळ विविक्षित (Site Specific) वन्यजीव संरक्षण आराखडा तयार करुन अंमलबजावणी करावयाची आहे. त्याबाबतचा अहवाल प्रकल्प यंत्रणेने केंद्रशासनास तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तीच्या पूर्तता अहवालासोबत सादर करावयाचा आहे. बाबत उप वनसंरक्षक यांनी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यसाठीचा वन्यजीव संरक्षण आराखडा तयार केलेला असून त्याची मान्यता घेतली आहे, तसेच सदर आराखड्याची अंमलबजावणी सुरु आहे.

12) प्रस्तावांतर्गत विद्युतवाहिनी जात असलेल्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राकामी सदस्य सचिव, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, ESZ संनियंत्रण समिती तथा विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी काही अटी / शर्तीच्या अधिन राहून अ.क्र. 6 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूरी पत्रातील अटी / शर्ती प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

13) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.14 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

14) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.18 मध्ये वळतेकरण क्षेत्राचे सीमांकन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाच्या देखरेखीखाली करावयाचे आहे. बाबत प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 15,87,510/- अदा केलेले आहे.

15) वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासन तत्वतः मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता प्रकल्प प्राधिकरणाकडून काटेकोरपणे होईल याबाबत दक्षता घ्यावी. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांना सादर करतील.

16) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत क्षेत्रात काम सुरु करण्यापूर्वी, सबंधित उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे. सबंधित उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. वनभंग झाल्याचे निर्दशनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवाह मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार कारवाई करतील.

17) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

18) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वन संपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

19) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.1, 4b, 7, 8, 9, 12, 14, 15, 16, 17, 19, 20, 21, 22, 24 व 25 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्दयांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**अनुसूची**

| अ.क्र. | गावाचे नांव | जिल्हा | सी.टी.एस. नंबर | सर्व्हे / गट नंबर | क्षेत्र हेक्टर | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ऐरोली | ठाणे | -- | 137 पार्ट | 3.0590 | राखीव वन |
| 2. | | | -- | 300 | 1.8669 | राखीव वन |
| 3. | मुलूंड | | 1318 | 351 | 6.1761 | राखीव वन |
| 4. | मुलूंड | | 1319 | 387 | 4.8208 | राखीव वन |
| 5. | मुलूंड | | Unsurveyed Creek | -- | 0.8086 | कांदळवन |
| 6. | मुलूंड | | 1320 A/ 18/4 | 386 | 0.2820 | वन |
| 7. | नाहुर | | 796/2 | 157 | 0.3000 | राखीव वन |
| 8. | भांडुप | | 477 | 63 | 4.6433 | राखीव वन |
| 9. | कांजुर | | 657 अ | 275 पार्ट | 11.3467 | राखीव वन |
| 10. | | | Unsurveyed Creek | -- | 3.4478 | राखीव वन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11. | हरियाली | | 361 | 113 पार्ट | 0.1780 | कांदळवन |
| 12. | | | 363 | | 0.0303 | राखीव वन |
| 13. | विक्रोळी | | 209 | -- | 1.1124 | राखीव वन |
| 14. | | | 1A | 65 पार्ट | 11.2233 | खाजगी कांदळवन |
| 15. | | | 1C | 136 | 2.0681 | राखीव वन |
| **एकूण** | | | | | **51.3635** | -- |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

sd/xxx
**(एस. व्ही. रामाराव)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रति,

विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई

प्रतिलिपी :- प्रधान सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी ठाणे व मुंबई उपनगर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाही सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- प्राधिकृत अधिकारी खारघर-विक्रोळी ट्रान्समिशन प्रा. मर्यादित, अदानी कार्पोरेट हाऊस, शांती ग्राम हायवे, अहमदाबाद, गुजरात - 382421 यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

2.00 निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि राज्य शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत संबंधित विभागास देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-११ (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

Rama Rao
**(एस. व्ही. रामाराव)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.**